**L. A. BILL No.XXIV OF 2024.**

A BILL
FURTHER TO AMEND SHREE SIDDHI VINAYAK GANPATI TEMPLE TRUST (PRABHADEVI) ACT, 1980.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.**

**श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९८१ चा महा. ६.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;

२०२४ चा महा. अध्या. १५.



एचबी २३५१—१

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ५ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९८१ चा महा. ६.

" (३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, एक सभापती, एक कोषाध्यक्ष आणि पंधरापेक्षा अधिक नसतील असे इतर सदस्य यांची मिळून बनणारी एक समिती नियुक्त करील. ".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " तीन वर्षांसाठी " या मजकुराऐवजी, " पाच वर्षांसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शंका दूर करणे.

**४.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अधिनियम, २०२४ याद्वारे, समितीच्या सदस्यांचा पदावधी वाढविण्याच्या संबंधात केलेली सुधारणा, उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी नियुक्त केलेल्या, सभापती व कोषाध्यक्ष यांच्यासह, सर्व सदस्यांना लागू असेल. २०२४ चा महा. .

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ याचे निरसन व व्यावृत्ती.

**५.** (१) श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२४ चा महा. अध्या. १५.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० (१९८१ चा महा. ६) याच्या कलम ५ मध्ये, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समितीची तरतूद केलेली असून ती, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) चे व्यवस्थापन पहाते. उक्त कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एक सभापती, एक कोषाध्यक्ष आणि सातपेक्षा अधिक नसतील असे इतर सदस्य यांची मिळून होणारी एक समिती नियुक्त करील, अशी तरतूद केली आहे.

कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये, सभापती व कोषाध्यक्ष यांच्यासह समितीच्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षे इतका असेल अशी तरतूद केली आहे.

**२.** विश्वस्तव्यवस्थेला, भक्तांसाठी अधिक चांगल्या सुविधा पुरविणे तसेच त्यांच्या कल्याणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करणे आणि उक्त विश्वस्तव्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन व उत्तम प्रशासन करणे शक्य व्हावे यासाठी, व्यवस्थापन समितीच्या इतर सदस्यांची एकूण संख्या नऊ वरून पंधरा इतकी वाढविणे आणि समितीच्या सदस्यांचा पदावधी, तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविणे आवश्यक होते.

**३.** म्हणून, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये आणि कलम ७ च्या पोट-कलम (१) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. १५), हा प्रख्यापित केला होता.

**५.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १५ डिसेंबर, २०२४.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४–श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४**

**(श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यातील उतारे)**

**(सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)**

**१.** ते **४.** XX XX XX

**५.** (१) आणि (२) XX XX XX

मंदिर विश्वस्त व्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी समितीची रचना.

(३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एक सभापती, एक कोषाध्यक्ष आणि साताहून अधिक नसतील असे इतर सदस्य यांची मिळून होणारी एक समिती नियुक्त करील :

परंतु, राज्य शासनाला, वेळोवेळी तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे इतर सदस्यांची संख्या वाढविता येईल, मात्र सदस्यांची एकूण संख्या अकरापेक्षा अधिक असणार नाही.

**६.** XX XX XX

**७.** (१) सदस्यांची नियुक्ती ही तीन वर्षांसाठी असेल आणि तो परत नियुक्त होण्यास पात्र असेल : सदस्यांचा पदावती.

परंतु, अशा मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, नवीन समिती स्थापन करणारी अधिसूचना **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापर्यंत, वाढवला गेल्याचे, व त्या दिनांकास समाप्त होत असल्याचे मानण्यात येईल.

(२) आणि (३) XX XX XX

**८.** ते **२७.** XX XX XX

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४. ]**

**[ श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[ श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री. **]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

एचबी २३५१–२